# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **आझाद नगर, गोल्डन नेस्ट परिसरातील आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागास यश**
- **आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मदतीकरीता उपस्थित राहिल्याबद्दल मुंबई अग्निशमन दल, ठाणे अग्निशमन दल व वसई विरार अग्निशमन दलाचे आभार - मा. आयुक्त**

दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आझाद नगर, गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व परिसरात लागलेल्या भीषण आगीवर मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार अग्निशमन विभागामार्फत नियंत्रण मिळवण्यात यश प्राप्त झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या स्व. कल्पना चावला मुख्य कार्यालयात दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी पहाटे ठीक 5:51 वाजता आझाद नगर, गोल्डन नेस्ट, भाईंदर (पु.) येथे आग लागल्याची माहिती प्राप्त झाली. माहिती प्राप्त होताच तातडीने सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे वॉटर टेंडर अधिकारी व कर्मचारी दाखल झाले. घटनास्थळी पोहचल्यानंतर पाहणी केली असता सदरची आग तेथे असलेल्या झोपड्यांना लागल्याचे निदर्शनास आले. सदरची लागलेली आग मोठ्या प्रमाणात असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व अग्निशमन केंद्रातील वाहनांसह अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. परंतु आगीचे रौद्ररूप पाहता मुंबई अग्निशमन दल, ठाणे अग्निशमन दल व वसई विरार अग्निशमन दल यांना संपर्क करून मदतीकरीता तात्काळ घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. मुंबई अग्निशमन दलाचे 07, ठाणे अग्निशमन दलाचे 03, वसई विरार अग्निशमन दलाचे 03 तसेच मिरा भाईंदर अग्निशमन दलाचे 11 वाहने असे एकूण 24 वाहने घटनास्थळी उपस्थित होत्या. सदर वाहनांच्या व सर्व अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने लागलेली आग नियंत्रणात आणण्यासाठी यश प्राप्त झाले. त्याचबरोबर पाणी पुरवठा विभागामार्फत टँकर व सार्व. आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय पथक व अँब्युलन्स उपलब्ध करून घेण्यात आले होते. भीषण आगीच्या दुर्घटनेत जखमी झालेले आदरणीय नागरिक आणि फायरमन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी रुग्णालयात भेट देऊन त्यांना धीर दिला. घटनास्थळी आपले कर्तव्य बजावत असताना भाईदर अग्निशमन दलातील यंत्रचालक शिवाजी सावंत हे एल. पी. जी सिलेंडरच्या झालेल्या स्फोटामुळे जखमी झालेले असुन तुंगा रुग्णालयात उपचार घेत आहे. त्याचबरोबर संतोष पाटील यांचे तळहात आगीमध्ये भाजले असल्याने त्यांना भारतरत्न

पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचार देऊन घरी सोडण्यात आले आहे. सदर घटनेत दिपक चौरसिया वय वर्ष 42 हे मयत झालेले असून 02 मुले जखमी अवस्थेत असल्याने त्यांना रुग्णालयात तातडीने उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे. 02 मुलांमधील एका मुलाची प्रकृती गंभीर असल्याने त्यास मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार तातडीने वॉकहार्ड रुग्णालयात दाखल करण्यात आले व त्यावर आवश्यक उपचार सुरू आहेत. सदर घटनास्थळी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त संजय शिंदे तसेच पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड तसेच प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे, तसेच अग्निशमन विभागाचे केंद्र अधिकारी दिलीप रणवरे, धनंजय कनोजे, जगदीश पाटील, सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी अल्पेश संखे, डॉसन ढोल्या, सदानंद पाटील, प्रशांत गुरव, छोटूलाल अदिवाल व सर्व अग्निशमन कर्मचारी उपस्थित होते. भीषण आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी व आपत्कालीन परिस्थितीत मदतीकरीता उपस्थित राहिल्याबद्दल मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अधिकारी सोमनाथ जयभाये व त्यांचे कर्मचारी, ठाणे अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी प्रमोद कालिंगे, दिनेश पाटील व त्यांचे कर्मचारी व वसई विरार अग्निशमन दलाचे ड्युटी प्रमुख मोहनिश पाटील व कर्मचारी यांचे मा. आयुक्त यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.